आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ, संचालित

बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव

शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग

वार्षिक अहवाल - २०१९-२०२०

या शैक्षणिक वर्षाचा अहवाल सादर करतांना मनस्वी आनंद वाटतो की, महाविद्यालयाने पुणे जिल्हा क्रीडा विभागाच्या, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध क्रीडा व क्रीडा स्पर्धा आयोजन तसेच क्रीडा विषय विविध उपक्रमात सहभाग घेऊन उज्वल यश संपादन केले आहे. या सर्व उपक्रमांचा वृत्तांत पुढीलप्रमाणे -

१) पुणे जिल्हा आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा सहभाग व प्रावीण्य -

अ.क्र.	क्रीडा प्रकार	खेळाडू संख्या	संघाचे प्राविण्य	स्पर्धेचे ठिकाण
१.	कबड्डी (मुले)	१२	सहभाग	वेल्हा
२.	कबड्डी (मुली)	१०	सहभाग	वडगाव सहाणी
३.	फुटबॉल (मुले)	१३	सहभाग	लोणावळा
४.	क्रिकेट (मुले)	१३	सहभाग	ओतूर
५.	क्रिकेट (मुली)	१४	विजेतेपद	घोडेगाव (मंचर)
६.	ॲथेलेटीक्स (मुले)	०१	सहभाग	ओतूर
७.	ॲथेलेटीक्स (मुली)	०४	सहभाग	ओतूर
८.	वेट लिफ्टींग (मुली)	०४	सहभाग	विंझर
९.	पावर लिफ्टींग (मुले)	०२	सहभाग	तळेगाव दाभाडे
१०.	पावर लिफ्टींग (मुली)	०९	सहभाग	तळेगाव दाभाडे
११.	मल्लखांब (मुले)	०१	सहभाग	सांगवी (पुणे)

TRUE COPY

Principal
B.D.Kale Mahavidyalaya
Ghodegaon

अ.क्र.	क्रीडा प्रकार	खेळाडू संख्या	संघाचे प्राविण्य	स्पर्धेचे ठिकाण
१२.	रोप मल्लखांब (मुली)	०५	सहभाग	सांगवी (पुणे)
१३.	कुस्ती (मुले)	०५	सहभाग	सोमेश्वरनगर
१४.	क्रॉसकंट्री (मुले)	०६	सहभाग	आळे
१५.	क्रॉसकंट्री (मुली)	०६	उपविजेतेपद	आळे
१६.	योगासन (मुली)	०६	उपविजेतेपद	लोणीकंद
१७.	बॉक्सींग (मुली)	०२	उपविजेतेपद	वाघोली
	एकूण सहभागी खेळाडू - ११३			

२) पुणे जिल्हा आंतरमहाविद्यालयीन वैयक्तीक क्रीडा स्पर्धेतील प्राविण्य प्राप्त खेळाडू -

अ.क्र.	खेळाडूचे नाव	क्रीडा प्रकार	प्राविण्य	स्पर्धेचे ठिकाण
१.	कु. प्राजक्ता संदिप काळे	वेटलिफ्टींग	प्रथम क्रमांक	तळेगाव दाभाडे
२.	कु. वर्षा संजय शेळके	पावर लिफ्टींग	प्रथम क्रमांक	तळेगाव दाभाडे
		बॉक्सीग	द्वितीय क्रमांक	वाघोली
३.	कु. प्रांजल काळूराम मोहरे	बॉक्सींग	द्वितीय क्रमांक	वाघोली
		पावर लिफ्टींग	तृतीय क्रमांक	तळेगाव दाभाडे
४.	कु. नेहा सुदाम तळपे	पावर लिफ्टींग	तृतीय क्रमांक	तळेगाव दाभाडे
५.	कु. दिव्या सोपान शेगर	पावर लिफ्टींग	तृतीय क्रमांक	तळेगाव दाभाडे
६.	कु. पूनम विश्वास गेंगजे	पावर लिफ्टींग	तृतीय क्रमांक	तळेगाव दाभाडे
७.	कु. करूणा विश्वास पोखरकर	वेट लिफ्टींग	तृतीय क्रमांक	विंझर

३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेसाठी पुणे जिल्हा विभाग संघात निवड झालेले खेळाडू -

अ.क्र.	खेळाडूचे नाव	क्रीडा प्रकार	प्राविण्य	ठिकाण
१.	कु. अश्विनी नवनाथ काळे	क्रांसकंट्री	तृतीय क्रमांक	घोडेगाव
२.	कु. प्रणाली भरत गव्हाणे	रोप मल्लखांब	उपविजेतेपद	प्रवरानगर
३.	कु. वर्षा संजय शेळके	पावर लिफ्टींग	उपविजेतेपद	श्रीरामपुर
४.	कु. नेहा सुदाम तळपे	पावर लिफ्टींग	उपविजेतेपद	श्रीरामपुर
५.	कु. प्रांजल काळूराम मोहरे	पावर लिफ्टींग	उपविजेतेपद	श्रीरामपुर
६.	कु. दिव्या सोपान शेगर	पावर लिफ्टींग	उपविजेतेपद	श्रीरामपुर
७.	कु. वर्षा संजय शेळके	बॉक्सींग	उपविजेतेपद	वाघोली
८.	कु. प्रांजल काळूराम मोहरे	बॉक्सींग	उपविजेतेपद	वाघोली
९.	कु. चैत्राली सुदाम कोकणे	क्रिकेट	तृतीय क्रमांक	पुणे
१०.	कु. दिव्या संतोष निघोट	क्रिकेट	तृतीय क्रमांक	पुणे
११.	कु. कांचन रामचंद्र लांडे	क्रिकेट	तृतीय क्रमांक	पुणे
१२.	कु. मुस्कान छगन शेख	क्रिकेट	तृतीय क्रमांक	पुणे
१३.	कु. आश्लेषा हरिश्चंद्र काळे	क्रिकेट	तृतीय क्रमांक	पुणे
१४	कु. प्रांजल शरद काळे	क्रिकेट	तृतीय क्रमांक	पुणे
१५.	शुभम संजय कानसकर	कबड्डी	तृतीय क्रमांक	चांदवड

४) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रिकेट संघात निवड झालेली प्राविण्य प्राप्त खेळाडू -

अ.क्र.	खेळाडूचे नाव	स्पर्धेचा स्तर	प्राविण्य	ठिकाण
१.	कु. चैत्राली सुदाम कोकणे (पुणे जिल्हा कर्णधार)	पश्चिम विभागीय आंतर-विद्यापीठ क्रिकेट स्पर्धा	उपविजेतेपद	भोपाळ (मध्यप्रदेश)
		अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ क्रिकेट स्पर्धा		जयपुर (राजस्थान)

TRUE COPY

Principal
B.D.Kale Mahavidyalaya
Ghodegaon

५) क्रीडा स्पर्धांचे आयोजन -

पुणे जिल्हा क्रीडा विभागाच्या आंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेचे आयोजन दि. ४ व ५ डिसेंबर २०१९ रोजी बी.डी. काळे महाविद्यालयाच्या वतीने मंचर येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयाच्या मैदानावर केले. यात सात महाविद्यालयाच्या खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरविभागीय क्रॉसकंट्री (मुले, मुली) स्पर्धेचे आयोजनही दि. २१ व २२ ऑगस्ट २०१९ रोजी करण्यात आले होते. यात नाशिक, अहमदनगर, पुणे जिल्हा व पुणे शहर अशा चार विभागाच्या खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

वरील दोन्ही स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयाने यशस्वीपणे केले.

६) जागतिक योग दिन कार्यक्रम -

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना योग व प्राणायामाची ओळख व्हावी त्याचा सर्वत्र प्रसार व प्रचार व्हावा. तसेच योग व प्राणायमाद्वारे शरीर व मन सदृढ व्हावे या उद्देशाने दर वर्षाप्रमाणे या वर्षीही २१ जून २०१९ हा आंतरराष्ट्रीय (जागतिक) योग दिन म्हणून साजरा करण्यात आला. यात महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थींनी, शिक्षक व शिक्षकेत्तर वृंद सहभागी झाले होते. यात योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले.

७) फिट इंडिया कार्यक्रम -

फीट इंडिया मुव्हमेंट कार्यक्रम अंतर्गत क्रीडा विभागाने दि. २९ ऑगस्ट २०१९ रोजी रन ॲन्ड वॉक कार्यक्रम आयोजित केला होता. तसेच दि. १८ जानेवारी २०२० रोजी वॉल्कॅथॉन कार्यक्रम आयोजित केला. यात डोंगर चढाई, गिरीभ्रमण, सुर्यनमस्कार, चालणे, पळणे व शारिरीक व्यायाम प्रकार इत्यादी गोष्टींचा समावेश होता.

८) वार्षिक क्रीडा महोत्सव -

महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना क्रीडा सहभागाची संधी मिळावी म्हणून दि. १४ ते १६ जानेवारी २०२० दरम्यान क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. क्रीडा महोत्सवात कबड्डी, व्हॉलीबॉल, क्रिकेट, क्रॉसकंट्री, ॲथलेटीक्स इ. क्रीडा प्रकारांचा समावेश होता. यात मुलांचे सांघिक विजेतेपद (टीम चॅम्पियनशीप) एफ.वाय.बी.कॉम वर्गाने तर मुलींचे सांघिक विजेतेपद विज्ञान शाखेने मिळविले.

उत्कृष्ट खेळाडू म्हणून कबड्डी - विजय काळे, कु. स्वप्नाली पकळे, व्हॉलीबॉलमध्ये अक्षय पारधी, प्रणाली गव्हाणे तर क्रिकेटमध्ये निशांत तळेकर यांची निवड करण्यात आली. तसेच वैयक्तिक जनरल चॅम्पियनशीपचा सन्मान मुलांमध्ये प्रथमेश सुर्यकांत काळे तर मुलींमध्ये कु. चैत्राली सुदाम कोकणे हिने मिळविला.

९) वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ (स्पोर्टस् डे) -

सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयाच्या खेळाडूंनी पुणे जिल्हा आंतरमहाविद्यालयीन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा व अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा तसेच वार्षिक क्रीडा महोत्सवात उज्वल यश संपादन केलेल्या सर्व खेळाडूंचा सन्मान वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ (स्पोर्टस् डे) दिनांक ३० जानेवारी २०२० रोजी मा. ना. दिलीपरावजी वळसे पाटील (कामगार व राज्य उत्पादन शुल्क मंत्री, महाराष्ट्र राज्य) व मा. श्री. अशोक नायगावकर (सुप्रसिध्द कवी) या प्रमुख अतिथींच्या हस्ते खेळाडूंना पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला.

१०) शारीरिक शिक्षण योजना -

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी असलेली शारीरिक शिक्षण योजना त्यात विद्यार्थ्यांचा सहभाग, प्रोजेक्ट वर्क, शारिरिक क्षमता चाचणी (Fitness Test) घेऊन यशस्वीपणे राबविण्यात आली. दि. २७, २८ फेब्रुवारी २०२० रोजी या विद्यार्थ्यांची विद्यापीठ प्रात्यक्षिक परीक्षाही घेण्यात आली.

११) मुलींचे साहसी गिर्यारोहण शिबीर (ट्रेक) -

मुलींमध्ये शारिरीक क्षमता वाढावी, निसर्गाची आवड निर्माण व्हावी तसेच त्यांच्या साहसी व धाडसी वृत्ती निर्माण होऊन त्या निर्भय व्हाव्यात म्हणून खास मुलींसाठी दि. २ व ३ मार्च २०२० रोजी सांधणव्हॅली ते रतनगड, ता. अकोले, जि. अहमदनगर येथे गिर्यारोहण व गिरीभ्रमण साहस शिबीराचे (ट्रेकचे) आयोजन करण्यात आले होते.

या साहस शिबीरात १३ मुलींनी सहभाग घेतला. या ट्रेकमध्ये मुलींनी जंगलातील भटकंती, अवघड कडेकपारी चढाई, अंधारी भुयारी मार्गाचा अनुभव, रोप क्लाईबींग इत्यादी अविस्मरणीय व साहसी गोष्टींचा अनुभव घेतला. यावर्षी क्रीडा विभागाला मदतनीस म्हणून कु. आदिती दशरथ काळे (क्रिकेट कोच) हिचेही सहकार्य लाभले आहे. तिचे ही क्रीडा विभागाच्या वतीने हार्दिक अभिनंदन.

वरीलप्रमाणे शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाने उत्कृष्ठपणे कामगिरी करून अहवाल सादर केला असून विभागाचे काम प्रा. थोरात बी. जी. यांनी पाहिले आहे.

प्रा. भाऊसाहेब गंगाधर थोरात
शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग प्रमुख
बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव

TRUE COPY
Principal
B.D.Kale Mahavidyalaya
Ghodegaon